


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २६१ वा | सोमवार दि २९ डिसेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बोथेंवर फौजदारी कारवाईसाठी डॉ.सुशीलकुमार वाकचौरे यांचे हात थरथर करताहेत का?

## प्रकाश नामदेव बोथे म्हणजे चोर आणि वरून शिरजोर या उक्तीप्रमाणे वागणारे मुजोर व्यक्तिमत्व

**जनसंचलन/बुलढाणा**

चौकशी समितीत दोषी आढळलेल्या व तात्काळ फौजदारी कारवाईची गरज असलेल्या बहुचर्चित भांडारपाल बडतर्फ प्रकाश नामदेव बोथे राहणार गोरक्षण परीसर अकोला यांच्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून तत्कालीन आरोग्य उपसंचालक अकोला डॉ.कमलेश भंडारी यांना विभागीय चौकशी अहवालात दोष सिद्ध पत्रव्यवहार करूनही कारवाई शून्य डॉ.भंडारी नंतर कर्तव्यबजावत असलेले उप संचालक अकोला डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांचेही हात थरथरत आहेत का, असा महत्वपूर्ण प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. प्रकाश बोथे यांच्यावर जी विभागीय चौकशी बसवण्यात आली होती, त्या अहवालात अत्यंत गंभीर असे निष्कर्ष समोर आलेले आहेत. त्यामुळे प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम अकोला ही आरोग्य विभागाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड आहे, हे सिद्ध होते. असे असताना देखील प्रकाश बोथे चौकशी समितीशी अत्यंत असहकार करीत आपली मुजोरी सिद्ध केली आहे. यानुसार एकच म्हणावेसे वाटते की, प्रकाश नामदेव बोथे हे चोर... आणि वरून शिरजोर या उक्तीप्रमाणे वागणारे मुजोर व्यक्तिमत्व आहे. सन २०१९ साली भांडारपाल या पदावर शैक्षणिक पात्रता आणि बौद्धिक लायकी नसताना देखील प्रकाश बोथे हे कार्यरत झाले. अर्थात, बोथे यांना या पदावर नियुक्ती देणाऱ्या अधिकाऱ्यावर देखील गंभीर स्वरूपाची कारवाई होणे गरजेचे आहे. कारण नियमात बसत नसतानाही करण्यात आलेली ही नियुक्ती नक्कीच अर्थपूर्ण देवाणघेवाण झाल्याशिवाय झालेली नाही, हे सिद्ध आहे. भांडारपाल पदावर कार्यरत झाल्यानंतर बोथे यांनी भ्रष्टाचाराची एक अनंत अशी मालिका सुरू केली. प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचार करीत मोठ्या प्रमाणात जिल्हा रुग्णालयाला चुना लावण्याचे काम केले. प्रकाश नामदेव बोथे यांनी कशाकशात भ्रष्टाचार केला हे आम्ही मागील प्रत्येक अंकात आम्ही सविस्तररित्या मांडले आहे. आता मुद्दा हा आहे की, बोथे यांची तक्रार झाल्यानंतर आणि यासंदर्भात चहूबाजूंनी दबाव आणला गेल्यानंतर अखेर बोथे यांची विभागीय चौकशी करण्यात आली.या विभागीय चौकशी दरम्यान स्वतःची बाजू मांडण्यासाठी बोथे यांना बोलावणे पाठवण्यात आले होते. परंतु भ्रष्टाचार करून करून प्रचंड माजलेल्या आणि गेंड्याच्या कातडीचे बनलेल्या बोथे यांनी चक्क पोस्टाद्वारे आलेली नोटीसदेखील स्वीकारण्याचे सौजन्य दाखवले नाही. शिवाय त्यांच्या वैयक्तिक फोन नंबरवर संपर्क केला असता, मी आजारी असल्याचे त्यांनी कळवले. यावरून हे स्पष्ट आहे की, प्रकाश बोथे हे चोर...आणि वरून शिरजोर या उक्तीप्रमाणे वागणारे मुजोर व्यक्तिमत्व आहे. प्रकाश नामदेव बोथे यांच्या या नालायक कृतीमुळे अखेर चौकशी समितीने त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस आपल्या अहवालात केली.खरे तर सुमारे काही महिन्यांपूर्वी हा अहवाल आरोग्य उपसंचालक अकोला यांना पाठवण्यात आलेला आहे. परंतु तत्कालीन आरोग्य उपसंचालक अकोला डॉ. कमलेश भंडारी यांनी हा अहवाल धूळखात ठेवला आहे. अत्यंत बेशरमपणे आणि बेदरकारपणे भ्रष्टाचार करणारा, शासनाला कोट्यवधी रुपयांचा चुना लावणाऱ्या आणि लायकी नसतानाही पदावर असणाऱ्या अधिकाऱ्याच्या विरोधात तात्काळ कारवाई होणे गरजेचे आहे. परंतु तत्कालीन उपसंचालक अकोला डॉ.भंडारी हे नेमके कशासाठी टाळाटाळ करीत आहेत, हे अद्यापही कोणाच्या लक्षात आलेले नाही. डॉ. भंडारी यांनी कारवाई न करण्याचे कारण नेमके काय, हे खरे तर जनतेला कळणे गरजेचे आहे. कारवाईस सक्षम नसलेले डॉ भंडारे उचलबांगडी नंतर पदभार स्वीकारलेले डॉ सुशील वाघचौरे यांच्याशी यासंदर्भात हॅलो बुलडाणा,सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने डॉ.वाकचौरे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु डॉ. वाकचौरे हे माहिती देण्यापासून आणि पत्रकारांच्या प्रश्नांपासून अक्षरशः पळ काढताना दिसून येत आहेत. प्रकाश बोथे यांच्यावर फौजदारी कारवाई केली, तर आरोग्य विभागावर नेमके असे कोणते आकाश येऊन कोसळणार आहे, हा




न कळण्यापलिकडे गेलेला विषय आहे. कदाचित बोथे हे आपल्याच अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल तर करीत नाहीत ना, असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. बोथे हे जर अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करीत असतील, तर यामध्ये कोणाकोणाचे पितळ उघडे पडणार आहे, हाही मोठा प्रश्न आहे. त्यामुळे डॉ.वाकचौरे यांना आमचे आवाहन आहे की, तुम्ही तात्काळ अशा भ्रष्टाचारी व नालायक अधिकाऱ्यावर कारवाई करावी. अन्यथा तुमचा ढिसाळपणा आणि तुमचा निष्क्रियपणा सिद्ध होईल. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज भ्रष्टाचार करणारे आणि भ्रष्टाचाऱ्यांना वाचवणाऱ्या कोण्याही अधिकाऱ्याची गय करीत नाही. जोपर्यंत प्रकाश नामदेव बोथे सारख्या नालायक, निर्लज्ज, भ्रष्टाचारी आणि बदमाश अधिकाऱ्याला गजाआड केले जात नाही, तोपर्यंत या विषयाचा पाठपुरावा करीतच राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

---

## बुलढाण्यात चोरी टोळ्याला जबरदस्त धक्का! तीन आरोपी जेरबंद; चार गुन्हे उघड, अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात वाढत असलेल्या चोरीच्या घटनांवर अखेर बुलढाणा पोलिसांनी वचक बसवला आहे. मा. पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. श्रेणीक लोढा (खामगाव) व श्री. अमोल गायकवाड (बुलढाणा) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत आंतरजिल्हा चोरी टोळीचा पर्दाफाश केला आहे. मा. पोलीस निरीक्षक श्री. सुनील अंबुलकर यांच्या आदेशाने २७ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आलेल्या समांतर तपासात बुलढाणा शहर पोलीस ठाण्याच्या . . ९४९/२०२१ (कलम ३७९ भादंवि) प्रकरणात मोठी प्रगती झाली. पोलिसांनी एकूण तीन आरोपींना ताब्यात घेऊन तब्बल चार चोरीचे गुन्हे उघडकीस आणले असून, त्यांच्याकडून २ लाख ५० हजार रुपये किमतीच्या चार मोसा (वाहने) जप्त करण्यात आल्या आहेत. ही चोरीची वाहने पोलीस स्टेशन बुलढाणा शहर, बोरखेडी तसेच नालासोपारा (मुंबई) येथून चोरीस गेल्याचे तपासात निष्पन्न झाले. उघडकीस आलेल्या गुन्ह्यांमध्ये बुलढाणा शहरातील दोन, बोरखेडीतील एक आणि नालासोपारातील एका गुन्ह्याचा समावेश आहे. अटक केलेल्या आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी बुलढाणा शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. या धडाकेबाज कारवाईत पंकज सपकाळे, दीपक लेकुरवाडे, एजाज खान, राजेंद्र अंभोरे,



अरविंद बडगे, अमोल शेजोल, अजीस परसूवाले, ऋषिकेश खंडेराव यांच्या पथकाने अत्यंत कौशल्यपूर्ण व धाडसी भूमिका बजावली.

# अरवली वाचवा!

## संपादकीय लेख




दिल्लीपासून सुरू होऊन हरियाणा, राजस्थानमार्गे गुजरातेतील अहमदाबादपर्यंत सुमारे ६७० किलोमीटर क्षेत्रात पसरलेल्या अरवली पर्वतरांगा सध्या चर्चेत आहेत, ते त्याच्या नवीन व्याख्येमुळे. अरवलीच्या क्षेत्रातील किमान शंभर मीटर उंचीचे डोंगर आणि अशा दोन डोंगरांत पाचशे मीटरचे अंतर, अशी नवी व्याख्या करण्यात आल्याने ही अट पूर्ण न करणाऱ्या डोंगरांवर खाणकाम वाढून पर्यावरणाला मोठी हानी पोहोचेल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. भीती व्यक्त करणाऱ्यांत राजकीय नेते असल्याने, त्यांच्याकडे अंगुलिनिर्देश करून त्याकडे राजकारण म्हणून पाहिले जात असले, तरी पर्यावरणवाद्यांकडूनही अतिशय गांभीर्याने हा मुद्दा मांडला जात आहे. ही भीती निराधार असल्याचा खुलासा करून आणि अरवलीच्या एकूण क्षेत्रफळाच्या ०.१९ टक्के क्षेत्रात खाणकाम होणार असल्याचा दावा केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्री भूपेंद्र यादव यांनी केला आहे; परंतु आजवरचा अनुभव पाहता अरवलीच्या क्षेत्राचे नुकसान होण्याची शक्यता अधिक वाटते. बेकायदा खाणकाम ामुळे गेल्या साठ वर्षांत अरवली पर्वतरांगांच्या २५ टक्के भागाची मोठी हानी झाल्याची आकडेवारी दुर्लक्षित करण्यासारखी नाही. अशा खाणकामातून तयार झालेल्या माफियांची ताकदही वाढत गेली आहे. तेव्हापासूनच अरवली वाचविण्यासाठी कार्यकर्ते पुढे सरसावले. परिणामी तिथे खाणकामाला आणि बांधकाम करण्याला १९९५मध्ये बंदी घालण्यात आली. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आणि २००२पासून २०१८पर्यंत विविध खटल्यांद्वारे बंदी कायम राहिली. मात्र, अरवलीला ओरबाडणे थांबले नाही. माफिया आणि हितसंबंधीयांच्या जाळ्याद्वारे बेकायदा खाणकाम कायम राहिले. त्यामुळेच सर्वोच्च न्यायावलयाने समिती नेमली; अरवलीचा पाव भाग पुरता ओरबाडला गेल्याचे या समितीच्या पाहणीतून समोर आले. यादव यांच्या खुलाशानंतरही अरवलीबद्दल चिंता व्यक्त होत आहे, ती या पार्श्वभूमीवर. अरवली पर्वतरांगांचे महत्त्व या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित करण्याची गरज आहे. देशाच्या वायव्य भागात सुमारे दीड लाख चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेल्या या डोंगररांगा वाळवंटीकरण रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. या डोंगरांच्या पश्चिमेकडील वाळवंट पूर्वेकडे सरकू न देण्याचे मोठे काम त्या करतात. याखेरीज त्यांच्यामुळे भूजल पाणीसाठा वाढतो. शिवाय हवेचे प्रदूषण रोखण्यासही मदत करतात. दर वर्षी नोव्हेंबर आणि डिसेंबर या महिन्यांत दिल्ली आणि परिसरातील हवा विषारी होते. अरवली पर्वतांवरील खाणकाम कायम राहिल्यास ती आणखी विषारी होण्याचा धोका आहे. त्यामुळे अरवली पर्वतरांगांचे सर्वार्थाने आणि सर्व परीने रक्षण करण्याची गरज आहे. मात्र, या पर्वतरांगांच्या ९० टक्के भागाचे रक्षण होणार असल्याची हमी यादव देतात. याचा अर्थ दहा टक्के भागाचे रक्षण होणार नसल्याची कबुलीच ते देतात. केंद्र सरकारने केलेल्या नव्या व्याख्येमुळे, शंभर मीटरहून लहान असलेल्या डोंगरांवर, तसेच दोन डोंगरांमधील अंतर अधिक असलेल्या ठिकाणी खाणकाम होऊ शकते, अशी चिंता पर्यावरणवादी व्यक्त करीत आहेत. मात्र, यादव यांना ही चिंता मान्य नाही. अरवली क्षेत्रात नवीन खाणकामांवर सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली असल्याने तिथे उत्खनन होणार नाही, असा दावा ते करतात. त्यांचे म्हणणे खरे मानले, तरी आपल्याकडे नियमांतून आणि कायद्यातून वाट काढण्याची जी पद्धत रुजली आहे, ती पाहता खाणकाम थांबण्याची शक्यता कमी होते. त्यामुळेच पर्यावरणवाद्यांची चिंता रास्त वाटते. त्यामुळेच अरवली वाचविण्याच्या चळवळीला बळ मिळत आहे. एरव्ही दुष्काळी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागांत मुसळधार पाऊस होण्याचा प्रकार वाढला आहे आणि पावसाळ्यात शहरे पाण्याखाली जाण्याच्या घटनाही वाढल्या आहेत. या सर्वांकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. ही संकटे नैसर्गिक असली, तरी ती मानवनिर्मित आहेत. पश्चिम घाटापासून पूर्वेकडील पर्वतरांगांपर्यंत आणि अरवलीपासून हिमालयीन पर्वतराजीपर्यंत सर्वच ठिकाणी निसर्गाचे लचके तोडण्याचे काम सुरू आहे. बेकायदा खाणकाम आणि बांधकामे यांमुळे निसर्ग विद्रूप झाला आहे. या साऱ्यांचा अभ्यास करून भविष्यातील संकटांचा इशारा शास्त्रज्ञांनी दिला तरी त्याकडे काणाडोळा करण्याची प्रवृत्ती आपल्याकडे बळावते आहे. अरवली पर्वतरांगांबाबत आज व्यक्त होत असलेली भीती आणि चिंता म्हणजे एक प्रकारे इशाराच. त्यावर खुलासे न करता पर्यावरणाबाबत संवेदनशील होत आणि भविष्याचा विचार करीत सरकारने त्याकडे गांभीर्याने पाहायला हवे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पुण्याच्या राजकारणात मोठा ट्विस्ट, दोन्ही गटांची चर्चा फिस्कटली, शरद पवार गटाचा मोठा निर्णय

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर गेल्या काही दिवसांपासून शहरात 'पुणे पॅटर्न'ची म्हणजेच शरद पवार आणि अजित पवार गटाच्या स्थानिक युतीची जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, आज दुपारी झालेल्या एका निर्णायक बैठकीत या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. जागावाटप आणि निवडणूक चिन्हावरून मतभेद झाल्यानंतर अजित पवारांसोबतची बैठक फिस्कटली असून, शरद पवारांच्या राष्ट्रवादीने पुन्हा एकदा महाविकास आघाडीच्या (मविआ) साथीनेच लढण्याचा निर्णय घेत थेट काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेशी जुळवून घेतले आहे.आज दुपारी अजित पवार गट आणि शरद पवार गट यांच्यात जागावाटपासाठी एक महत्त्वाची बैठक पार पडली. सूत्रांच्या



माहितीनुसार, या बैठकीत अजित पवारांच्या गटाकडून शरद पवारांच्या पक्षाला अत्यंत जाचक अटी घालण्यात आल्या. अजितदादांच्या गटाने शरद पवार गटाला पुण्यात केवळ ३५ जागा देण्याचा प्रस्ताव ठेवला. एवढचं नाही या ३५ जागांवरही उमेदवारांनी अजित पवारांच्या 'घड्याळ' या चिन्हावरच निवडणूक लढवावी, अशी अट घालण्यात आली. स्वतःच्या पक्षाचे अस्तित्व पणाला लावणारा हा प्रस्ताव शरद पवार गटाला पूर्णपणे अमान्य होता. त्यामुळे ही युती होणे अशक्य असल्याचे स्पष्ट होताच, शरद पवार गटाच्या नेत्यांनी बैठकीतून काढता पाय घेतला.अजित पवारांसोबतची बोलणी फिस्कटताच, शरद पवार गटाने वेळ न दवडता थेट महाविकास आघाडीच्या घटक पक्षांशी संपर्क साधला. पुण्यातील हॉटेल शांताई येथे तातडीने काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी यांची संयुक्त बैठक सुरू झाली. या बैठकीमुळे पुण्यात आता मविआ विरुद्ध महायुती असाच सामना रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.या महत्त्वपूर्ण बैठकीला तिन्ही पक्षांतील प्रमुख स्थानिक नेते उपस्थित आहेत. शरद पवार गटाकडून विशाल तांबे, अंकुश काकडे, मनाली भिलारे, अश्विनी कदम आणि आमदार बापूसाहेब पठारे, तर काँग्रेसकडून अरविंद शिंदे, अभय छाजेड आणि रमेश बागवे आणि ठाकरे गटाकडून (शिवसेना) वसंत मोरे, गजानन थरकुडे आणि संजय मोरे हे बैठकीत हजर आहेत.

पुणे महापालिकेत काका-पुतण्या एकत्र येतील या आशेवर असलेल्या कार्यकर्त्यांना या घडामोडीमुळे मोठा धक्का बसला आहे. मात्र, घड्याळ चिन्हावर लढण्यास नकार देत शरद पवार गटाने आपण आपल्या भूमिकेशी ठाम असल्याचे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. आता

## महाजनांचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश ; महापालिका निवडणुकीत तोफ धडाडणार

**ठाणे :** महाराष्ट्राच्या राजकारणात एका बाजूला ऐतिहासिक घडामोड घडत असतानाच, दुसऱ्या बाजूला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे. एकीकडे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी अधिकृतपणे युतीची घोषणा करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली असतानाच, राज यांचे एकेकाळचे कट्टर समर्थक आणि आक्रमक नेते प्रकाश महाजन यांनी 'जय महाराष्ट्र' करत थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला आहेविशेष म्हणजे, प्रकाश महाजन यांनी अनेकदा 'दोन्ही भावांनी (राज आणि उद्धव) एकत्र यावे,' अशी इच्छा बोलून दाखवली होती आणि त्यासाठी प्रयत्न केल्याचा दावाही केला होता. मात्र, नियतीचा खेळ असा की, ज्या वेळी हे दोन्ही भाऊ अधिकृतपणे एकत्र आले, नेम क्या त्याच वेळी महाजनांनी मात्र विरोधात उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे.म नसेतून बाहेर पडताना प्रकाश महाजन यांनी अत्यंत गंभीर आरोप केले होते. 'पक्षात



आपल्याला योग्य मान-सन्मान मिळाला नाही,' असे सांगत त्यांनी आपली नाराजी उघड केली होती. ही नाराजी इतकी तीव्र होती की, आज त्यांनी कोणत्याही गाजावाजाविना, अत्यंत शांतपणे एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हाती 'धनुष्यबाण' घेतलापक्षप्रवेशाचे टायमिंग आगामी महापालिका निवडणुकांसाठी अत्यंत सूचक मानले जात आहे. प्रकाश महाजन हे आता शिंदे गटाच्या वतीने थेट ठाकरे बंधूंच्या युतीविरोधात मैदानात उतरणार आहेत, हे स्पष्ट झाले आहे. त्यांची आक्रम क शैली आणि वक्तृत्व आता शिंदे गटाला तोफखाना म्हणून वापरता येणार आहे.

## जगतापांच्या प्रवेशानंतर काँग्रेसमध्ये खदखद

**पुणे :** पुणे महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसच्या मनोमिलनाला विरोध करून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा राजीनामा देणारे पुण्याचे माजी महापौर झीरिहरपीं गरसींर्र यांनी आपल्या सम र्थकांसह शुक्रवारी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. प्रशांत जगताप यांना अनेक पक्षांचे आमंत्रण असतानाही त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करणे पसंत केले. जगताप यांनी शहर काँग्रेसला 'बायपास' करून, प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीत हा प्रवेश केला. त्यामुळे त्याचे पडसाद शहर काँग्रेसमध्ये उमटले. काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी प्रशांत जगताप यांचे स्वागत केले असले, तरी 'लिव्ह अँड लायसन्स'वर पक्षात येऊ नका; पक्षाची विचारधारा स्वीकारा आणि त्याप्रमाणे वागा, असा इशारा दिला आहे.काँग्रेसमध्ये आधीच अनेक गट-तट आहेत. जगताप यांनी आपल्या समर्थकांसाठी विशिष्ट जागांचा आग्रह धरल्याची चर्चा आहे. दरम्यान, 'जगताप आमच्या पक्षात प्रवेश करणार असल्याची आम्हाला कल्पना नव्हती.

## महायुतीचा 'फॉर्म्युला' ठरला ? राष्ट्रवादीची ६ जागांवर बोळवण केल्याची चर्चा

**नाशिक :** मुंबईत भाजप व शिंदे गटामध्ये झालेल्या जागावाटपात नाशिकमध्ये भाजप ८०, शिंदे सेना ३५, तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला सहा जागा सोडण्याचा फॉर्म्युला निश्चित झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. दुसरीकडे महायुती झाल्यास आपले काय होणार, या शक्यतेने इच्छुक सैरभैर झाले आहेत. दरम्यान, महायुती झाल्यास संभाव्य बंडखोरांवर महाविकास आघाडीकडूनही नजर ठेवली जात आहे. नाशिक महापालिका निवडणुकांसाठी मंगळवारपासून (दि. २३) अर्ज भरण्यास प्रारंभ झाला असतानाही महायुतीच्या जागावाटपाचा तिढा सुटत नसल्याचे चित्र आहे. शिंदे सेनेने १२२ जागांमध्ये ४५ जागांचा हट्ट कायम ठेवला आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस ३० जागांवर अडून बसली आहे. त्यामुळे नाशिकमधील जागावाटपाचे सूत्र भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांमध्ये जमत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे भाजपने शिंदे सेना आणि राष्ट्रवादीसोबतच्या चर्चा थांबवल्या होत्या. दुसरीकडे भाजपने आता २०१७ च्या पॅटर्ननुसार स्वबळाची तयारी सुरू ठेवत, अन्य पक्षांतील दिग्गजांसाठी पक्षाची दारे उघडी ठेवली आहे. स्थानिक पातळीवर चर्चा थांबल्या असल्या तरी मुंबईत वरिष्ठांमध्ये मुंबई आणि नाशिकबाबत चर्चा सुरू आहे. त्यात नाशिकमधील जागावाटपाचाही फॉर्म्युला ठरल्याचे समजते. त्यात भाजपला सर्वाधिक ८० जागा, त्याखालोखाल शिवसेनेला ३५, तर राष्ट्रवादी काँग्रेसला सहा आणि रिपब्लिकन पक्षाला १ जागा सोडल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे भाजप आणि शिंदे सेनेकडून इच्छुकांच्या पोटात गोळा उठला आहे.भाजपकडून निवडणुकीसाठी १,०७७, तर शिंदे सेनेकडून निवडणूक लढण्यासाठी पाचशेपेक्षा अधिक इच्छुक आहेत. त्यामुळे महायुती झाल्यास जागांचे वाटप होऊन कमी जागा मिळणार असल्याने महायुतीकडून इच्छुक असलेल्यांचा हिरमोड होण्याची शक्यता आहे. ज्यांना उमेदवारी मिळणार नाही, त्यांच्यावर आता महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांकडून नजर ठेवली जात आहे.

## महापालिकेच्या १६५ जागांसाठी भाजपच्या दोन हजार इच्छुकांचा दावा

**पुणे :** महापालिकेच्या १६५ जागांवर भारतीय जनता पक्षाच्या सुमारे दोन हजार इच्छुकांनी दावा सांगितला आहे. त्याच वेळी विरोधकांचे प्राबल्य असलेल्या प्रभागांमध्ये भाजपमध्ये 'इनकमिंग' करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत इच्छुकांच्या रेट्यामुळे; तसेच बंडखोरी टाळण्यासाठी भाजपला उमेदवारांची 'यादी' जाहीर करण्यास टाळाटाळ करावी लागत असल्याचे चित्र आहे.केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार मेधा कुलकर्णी, शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, सुनील कांबळे, भीमराव तापकीर, हेमंत रासने, माजी मंत्री दिलीप कांबळे, पुण्याचे निवडणूक प्रमुख गणेश बीडकर या कोअर कमिटीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी गुरुवारी रात्री उमेदवारांची यादी अंतिम करण्याबाबत सविस्तर चर्चा केली.घोरपडे पेठ-गुरुवार



पेठ-समता भूमी या प्रभागात अनुसूचित जाती, ओबीसी (महिला), सर्वसाधारण (महिला) आणि सर्वसाधारण असे आरक्षण पडले आहे. खुल्या प्रवर्गातून पुरुष उमेदवाराला लढण्यासाठी येथे एकच जागा आहे. महापालिकेच्या गेल्या निवडणुकीत भाजपकडून अजय खेडेकर आणि सम्राट थोरात हे खुल्या आणि ओबीसी प्रवर्गातून निवडून आले होते. यंदा दोघांपैकी एकालाच लढण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे या दोघांपैकी एका माजी नगरसेवकाच्या घरातून महिलेला उमेदवारी द्यावी लागणार आहे. असाच तिढा औंध-बोपोडी या प्रभागातही झाला आहे. या प्रभागातून सनी निम्हण अथवा प्रकाश ढोरे यापैकी एकाला उमेदवारी मिळू शकणार आहे.प्रभागात 'सर्वसाधारण' आरक्षण असलेल्या बहुतांश प्रभागांमध्ये एकापेक्षा अधिक उमेदवारांनी तिकीट मिळवण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावली आहे. सूस-बाणेर-पाषाण, औंध-बोपोडी, बावधन-भुसारी कॉलनी, शंकर महाराज मठ-बिबवेवाडी, मुकुंदनगर- सॅलिसबरी पार्क, शनिवार पेठ-महात्मा फुले पेठ, शिवणे-खडकवासला, बालाजीनगर- आंबेगाव कात्रज, जनता वसाहत-हिंगणे खुर्द या प्रभागांमध्ये उमेदवारी अंतिम करताना भाजप नेत्यांची दमछाक होऊ लागली आहे. सूस-बाणेर-पाषाणमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य उमेदवारांमध्ये वादाच्या ठिणग्या उडत आहेत. त्यामुळे दबावतंत्र वापरण्यास सुरुवात झाली आहे.भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे या वेळी निवडणूक लढविणार नसल्याची चर्चा आहे. घाटे यांच्या वहिनी माजी नगरसेविका मनीषा घाटे; तसेच अमर आवळे निवडणुकीच्या रिंगणात उतरतील, अशी शक्यता आहे. घाटे विधानसभेसाठी इच्छुक होते. शहराध्यक्ष असल्याने घाटे यांना सगळ्याच प्रभागांमध्ये लक्ष द्यावे लागणार आहे. महापालिकेत सत्ता आल्यास घाटे यांना स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्तही करता येऊ शकणार आहे. याशिवाय आगामी विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी त्यांचा विचार होऊ शकतो, अशी चर्चा आहे. घाटे निवडणूक लढविणार नसल्याची चर्चा असली, तरी अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शनिवारच्या बैठकीत होणार असल्याचा दावा केला जात आहे.

# प्रेमविवाहाचा शेवट अंगावर काटा आणणारा! पत्नी जिवंत जाळली, मुलीवरही निर्दयी हल्ला; कारण समोर..

**हैदराबाद :** हैदराबादच्या नल्लकुंटा भागात एका धक्कादायक घटनेने माणुसकीला काळीमा फासला आहे. केवळ चारित्र्याच्या संशयावरून एका नराधम पतीने आपल्या दोन चिमुकल्या मुलांसमोर पत्नीवर पेट्रोल ओतून तिला जिवंत जाळले. आईला वाचवण्यासाठी धावलेल्या स्वतःच्या पोटच्या म ुलीलाही या राक्षसाने आगीत ढकलले. वेंकटेश नावाच्या या निर्दयी पतीने त्रिवेणी नावाच्या आपल्या पत्नीची निर्घृण हत्या केली. प्रेमविवाहानंतर काही वर्षे आनंदात गेल्यानंतर वेंकटेशला त्रिवेणीच्या चारित्र्यावर संशय येऊ लागला, ज्यामुळे त्याचे रूपांतर मारहाणीत झाले. पतीच्या जाचाला कंटाळून त्रिवेणी माहेरी गेली होती, पण मुलांच्या भविष्यासाठी ती पुन्हा सासरी परतली, जो निर्णय तिच्या जीवावर




बेतला.या घटनेच्या दिवशी वेंकटेश आणि त्रिवेणी यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. रागाच्या भरात वेंकटेशने माणुसकी सोडली. आपल्या दोन लहान मुलांसमोर त्याने पत्नीवर पेट्रोल ओतून पेटवून दिले. डोळ्यादेखत आईला जळताना पाहून तिची लहान मुलगी मदतीसाठी धावली, पण रक्ताच्या नात्याचा विसर पडलेल्या बापाने तिलाही आगीत ढकलले. या भयानक घटनेत त्रिवेणी यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. सुदैवाने, मुलीने स्वतःचा जीव वाचवला, पण ती गंभीररित्या भाजली असून तिला मोठा मानसिक धक्का बसला आहे. घटनेनंतर आरोपी वेंकटेश फरार झाला असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. या घटनेने परिसरात संताप आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.त्रिवेणी आणि वेंकटेश यांचे प्रेमविवाह झाले होते. सुरुवातीला त्यांचे नाते खूप चांगले होते. पण हळूहळू वेंकटेशच्या मनात संशयाचे भूत शिरले. तो त्रिवेणीच्या चारित्र्यावर उगाचच संशय घेऊ लागला. या संशयामुळे त्यांच्यात भांडणे सुरू झाली. वेंकटेश त्रिवेणीला मारहाण करू लागला. पतीच्या या त्रासाला कंटाळून त्रिवेणी माहेरी निघून गेली होती. पण आपल्या मुलांचे भविष्य चांगले असावे या विचाराने ती पुन्हा सासरी परतली. मात्र, तिचा हाच निर्णय तिच्यासाठी जीवघेणा ठरला.घटनेच्या दिवशी वेंकटेश आणि त्रिवेणी यांच्यात जोरदार वाद झाला. वेंकटेशचा पारा इतका चढला की त्याने माणुसकीला काळिमा फासला. त्याच्या डोळ्यासमोर त्याचे दोन लहान मुलगे होते. तरीही त्याने क्रूरपणे पत्नीवर पेट्रोल ओतले आणि पेटवून दिले. आईला आगीत जळताना पाहून तिची लहान मुलगी तिला वाचवण्यासाठी धावली. पण तिच्या वडिलांनी, म्हणजेच वेंकटेशने तिलाही आगीत ढकलले.

## विधवा महिलेसोबत उघडकीस आला धक्कादायक प्रकार

**बीड :** बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३५ वर्षीय विधवा महिलेवर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी ५७ वर्षीय व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अवघ्या दोन तासात अटक करण्यात आली आहे.मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार, सावळेश्वर (पैठण) येथील मधुकर उर्फ मदन विश्वनाथ म्हस्के (वय ५७) याने पीडित महिलेला शेतातील भाजीपाला घेऊन जाण्याच्या बहाण्याने शेतात बोलावले. सकाळच्या सुमारास ती महिला शेतात गेली असता, एकटेपणाचा गैरफायदा घेत आरोपीने तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. तसेच या घटनेची कुणाला माहिती दिल्यास जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे तक्रारीत फिर्यादीने नमूद आहे. या घटनेनंतर पीडितेने केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात तक्रार दाखल केली. त्यानुसार आरोपीविरुद्ध गुन्हा नं ३२६/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गुन्हा दाखल होताच युसूफ वडगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या म ार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भिम राव मांजरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक




अमजद सय्यद व पोलीस हेड कॉन्स्टेबल मोरे यांनी तात्काळ कारवाई करत अवघ्या एका तासात आरोपीला ताब्यात घेतले असल्याची माहिती संबंधित पोलिसांनी दिली. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भिमराव मांजरे करत असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आरोपीला तात्काळ अटक केल्याने पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत असले तरी अशा घटना रोखण्यासाठी कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. पीडित महिलेला वैद्यकीय तपासणीसह आवश्यक समुपदेशन व संरक्षण देण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## शिडी कोसळून चिमुकलीचा पाय फ्रॅक्चर

**सिन्नर :** बस पकडण्यासाठी धावणाऱ्या विद्यार्थ्यांच्या धक्क्याने रंगरंगोटीच्या कामासाठी उभी असलेली लोखंडी शिडी (घोडा) कोसळून झालेल्या अपघातात सात वर्षांची बालिका गंभीर जखमी झाली, तर आणखी दोघांना दुखापत झाली. शुक्रवारी (दि.२६) दुपारी सिन्नर बसस्थानकात ही घटना घडली.

राज्य परिवहन महामंडळाच्या सिन्नर बसस्थानकात पावसाळ्यात छताचा भाग कोसळल्यानंतर दुरुस्ती व रंगरंगोटीचे काम सुरू आहे. शुक्रवारी दुपारी फलाटावर रंग देण्याचे काम सुरू असताना शालेय विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होती. बस फलाटाकडे येताच विद्यार्थी जागा पकडण्यासाठी धावले. याचवेळी त्यांच्या धक्क्याने रंगरंगोटीच्या कामासाठी उभी केलेली लोखंडी शिडी सरकली व त्यावरील मजूर खाली कोसळला. ही शिडी अंगावर पडल्याने आईसोबत बसची प्रतीक्षा करत असलेली अभिज्ञा धनंजय पालवे (वय ७, रा. भगूर) ही बालिका जखमी झाली. तिच्या उजव्या पायाला फ्रॅक्चर झाले असून, हातालाही मार लागला आहे. याशिवाय एका प्रवाशाच्या डोक्याला दुखापत झाली, तर रंगरंगोटी करणारा मजुरही किरकोळ जखमी झाला. घटनेनंतर बसस्थानकात एकच गोंधळ उडाला. याच फलाटावर यापूर्वी बसच्या धडकेत एका बालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

## मुलीवर आधी बापाकडून अत्याचार, नंतर काका अनब शेजारच्या वृद्धाने



**अकोला :** राज्यात मुलींवरील अत्याचाराचं ग्रहण थांबता थांबत नाहीयत. त्यातल्या त्यात जर घरातच अत्याचार होत असेल तर अशावेळी मुलींनी जायचं कुठे? असा प्रश्न निर्माण होतो. अशीच संतापजनक घटना अकोल्यात उघडकीस आली आहे. वडील, काका आणि शेजाऱ्याने अत्याचाराची परिसीमा ओलांडल्यानं अल्पवयीन मुलीनं वर्ग शिक्षकाला आपबिती सांगितली. शिक्षकाने तातडीने गांभीर्य ओळखत मुख्याध्यापक आणि चाईल्ड हेल्प लाईनला माहिती दिली. चाईल्ड हेल्प लाईनच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून वडील, काका व शेजाऱ्याला अटक केली. अकोल्याच्या तेल्हारा तालुक्यातील एका गावामध्ये नात्याला काळिमा फासणारी एक घटना उघडकीस आली. अल्पवयीन मुलीवर जन्मदात्या बापासह काकाने आणि शेजारच्या वृद्धाकडून अत्याचार करण्यात आला. या घटनेची माहिती पीडित मुलीने शाळेतील शिक्षकांना सांगितली त्यांनी घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ चाइल्ड हेल्प लाइनशी संपर्क साधून तेल्हारा पोलिस स्टेशनला बुधवारी २४ डिसेंबरला तक्रार दाखल केली. अल्पवयीन पीडितेने घरी होत असलेला अत्याचार शाळेतील वर्ग शिक्षकाकडे कथन केला.सदर घटना ही गंभीर असल्यानं वर्ग शिक्षकानं याबाबत चाइल्ड हेल्पलाइनला माहिती दिली. याबाबत चाइल्ड हेल्पलाइनचं पथक शाळेत दाखल झालं. त्यांनी शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक तसेच गटशिक्षणाधिकारी यांच्याशी संपर्क साधून हे सर्व पोलीस स्टेशनला दाखल झालं. त्यांनी रीतसर तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी पीडितेचा आरोपी वडील, काका आणि शेजारच्या एका वृद्धाविरोधात गुन्हा दाखल करून आरोपी वडील, काका आणि शेजाऱ्याला अटक केली असून एक आरोपी फरार आहे.

# चॉकलेट देण्याच्या बहाण्याने शाळकरी मुलीवर अत्याचार

**पुणे :** ख्रिसमस पार्टीचे आमिष दाखवून १३ वर्षीय शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य केल्याप्रकरणी ज्येष्ठ नागरिकाला पुण्यातील काळेपडळ पोलिसांनी अटक केली आहे. कुतबुद्दीन अली महंमद (वय ७२, रा. महंमदवाडी, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने काळेपडळ पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी व तक्रारदार महिला एकाच सोसायटीत वास्तव्यास आहेत. बुधवारी (२४ डिसेंबर) रात्री साडेआठ वाजताच्या




सुमारास आरोपीने 'ख्रिसमस पार्टी करायला घरी येशील का, तुला चॉकलेट देतो,' असे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीला आपल्या घरी बोलावून घेतले. त्यानंतर सदनिकेचा दरवाजा बंद करून त्याने मुलीशी अश्लील कृत्य केले. घाबरलेल्या पीडित मुलीने झालेला हा प्रकार आपल्या घरी सांगितल्यानंतर तक्रार दाखल करण्यात आली. बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली आहे.दुसरीकडे, पादचारी महिलेशी अश्लील कृत्य करून तिला धमकावल्या प्रकरणी लष्कर पोलिसांनी एका जणाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत संबंधित महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली आहे.बलराज संदुपटला (रा. संगमवाडा, भवानी पेठ) असे आरोपीचे नाव आहे. तक्रारदार महिला लष्कर भागात काम करतात. २३ डिसेंबर रोजी रात्री सव्वाआठ वाजताच्या सुमारास त्या कामावरून घरी जात असताना आरोपीने त्यांना अडवून अपमानास्पद शब्द वापरून विनयभंग केला; तसेच 'तुझ्या मुलांना खोट्या पोलिस केसमध्ये अडकवतो,' अशी धमकी देऊन पाठलाग करून त्रास दिला. अखेर घाबरलेल्या महिलेने पोलिसांकडे धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# विराट कोहलीने वर्ल्ड रेकॉर्डसह रचला इतिहास, मायकल बेव्हनला टाकलं मागे

**बंगळुरु :** विराट कोहली हा सध्याच्या घडीला भन्नाट फॉर्मात आहे. विजय हझारे ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात विराटने शतक झळकावले होते, त्यानंतर आता दुसऱ्या सामन्यात तर विराटने थेट वर्ल्ड रेकॉर्डच आपल्या नावावर केला आहे. जगात जी गोष्ट कोणालाच आतापर्यंत जमली नाही, ती विराट कोहलीने करून दाखवली आहे.विराट कोहलीने गेल्या सामन्यात जेव्हा शतक झळकावलं होतं, तेव्हा त्याने सचिन तेंडुलकर यांचा मोठा विक्रम मोडीत काढला होता. विराट त्यानंतर आता दुसऱ्या सामन्यात खेळण्यासाठी उतरला. विराट कोहलीने या सामन्यात अर्धशतक झळकावलं आणि तो पुन्हा शतकाच्या दिशेने कूच करायला लागला होता. पण विराट कोहलीचे शतक यावेळी थोडक्यात हुकले. विराटने या सामन्यात १३ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ६१ चेंडूंत ७७ धावांची दमदार खेळी साकारली, विराटचे दुसरे शतक यावेळी २३ धावांनी हुकले. पण विराटचे शतक हुकले असले तरी त्याने या सामन्यात एक वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. विराट कोहलीने यावेळी ऑस्ट्रेलियाच्या दिग्गज खेळाडूला मागे टाकले आहे.क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाच्या मायकल बेव्हन कोण ओळखत नसेल, असे होणार नाही. विराट कोहलीने यावेळी मालकल बेव्हनचा वर्ल्ड रेकॉर्ड मोडला आहे. विराट कोहली यावेळी आपला ३४४ वा लिस्ट ए सामना खेळत होता. आतापर्यंत विराट कोहलीने लिस्ट ए सामन्यांत ५८ शतकं आणि ८५ अर्धशतकं झळकावली आहेत. विराटच्या नावावर आता १६, ०२७ धावा झाल्या आहेत. आपले ८५ वे अर्धशतक साकार करताना विराट कोहलीने मायकल बेव्हनचा मोठा वर्ल्ड रेकॉर्ड मोडीत काढला आहे. लिस्ट ए क्रिकेटमध्ये आतापर्यंत सर्वाधिक सरासरीचा वर्ल्ड रेकॉर्ड मायकल बेव्हनच्या नावावर होता. मायकल बेव्हनने ५७.८६ च्या सरासरीने धावा केल्या होत्या. बरीच वर्षे हा वर्ल्ड रेकॉर्ड मायकल बेव्हनच्या नावावर होता. पण आता हा रेकॉर्ड विराट कोहलीच्या नावावर झाला आहे. कारण विराट कोहलीने दुसऱ्या सामन्यात ७७ धावा केल्या आणि त्याची सरासरी ही आता ५७.८७ एवढी झाली आहे, जी आतापर्यंत जगभरात कोणालाही जमली नाही. त्यामुळे आता हा जगभरातील वर्ल्ड रेकॉर्ड विराट कोहलीच्या नावावर जमा झाला आहे.विराट कोहलीने दुसऱ्या सामन्यातही धडाकेबाज फलंदाजी करत आता एक मोठा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.



## भारताने पाहुण्यांना धुळ चारत साकारला मोठा विजय

**तिरुअनंतपुरम :** शेफाली वर्माच्या धडाकेबाज अर्धशतकामुळे श्रीलंकेच्या गोलंदाजांना लोटांगण घालायला लागल्याचे पाहायला मिळाले. शेफालीने सलग दुसरे अर्धशतक झळकावले आणि त्यामुळे भारताला तिसऱ्या टी २० सामन्यात श्रीलंकेवर आठ विकेट्स मोठा विजय मिळवता आला. भारताने श्रीलंकेला फक्त ११२ धावांत ऑल आऊट केले होते. त्यामुळे भारतासाठी हे आव्हान सोपे वाटत होते. पण शेफालीच्या अर्धशतकाच्या जोरावर भारताने सहजपणे हा विजय मिळवला. भारताने चौकार लगावला आणि विजयावर शिक्कामोर्तब केले.श्रीलंकेच्या गोलंदाजांना शेफालीने चांगलाच समाचार घेतला. सुरुवातीपासून तिने श्रीलंकेच्या गोलंदाजीवर जोरदार प्रहार करायला सुरुवात केली. शेफालीने यावेळी ११ चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ४९ चेंडूंत नाबाद ७९ धावांची खेळी साकारली. शेफालीच्या या खेळीच्या जोरावर भारताला हा दणदणीत विजय साकारता आला. भारताची या सामन्यात सुरुवात चांगली झाली नाही. कारम स्मृती मानधना यावेळी फक्त एकच धाव करू



शकली. भारतासाठी हा एक मोठा धक्का होता. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या जेमिमानेही फक्त ९ धावा केल्या. त्यामुळे भारताची बिकट अवस्था होईल, असे वाटत होते. पण शेफालीने एकहाती हा सामना भारताला जिंकवून दिला. शेफालीला यावेळी कर्णधार हरमनप्रीत कौरची चांगली साथ मिळाली. हरमनप्रीत कौरने या सामन्यात नाबाद २१ धावांची खेळी साकारली आणि शेफालीला चांगली साथ दिली.भारताच्या गोलंदांनी या विजयाचा पाया रचला. भारताची वेगवान गोलंदाज रेणुका सिंगने सुरुवातीपासून अचूक आणि भेदक मारा केला. फक्त रेणुका सिंगनेच श्रीलंकेच्या चार खेळाडूंना बाद केले आणि त्यांचे कंबरडे मोडले. रेणुकाला यावेळी चांगली साथ दिली.

## ट्रॉफीमधील तिसरी मॅचही विराट खेळणार?

**मुंबई :** विजय हजारे ट्रॉफीमध्ये विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या फलंदाजीचा चाहत्यांनी पुरेपूर आनंद घेतला. २४ डिसेंबर रोजी झालेल्या पहिल्या सामन्यात दोघांनीही शतके झळकावली. दुसऱ्या सामन्यात विराटने ७७ धावा केल्या, पण रोहित गोल्डन डकवर बाद झाला. आता प्रश्न असा आहे की रोहित शर्मा अँड विराट कोहली पुन्हा विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ खेळताना दिसतील का, कारण ही स्पर्धा १८ जानेवारीपर्यंत चालणार आहे. एका वृत्तानुसार, रोहित शर्माप्रमाणेच विराट कोहलीही सुरुवातीला विजय हजारे ट्रॉफीमध्ये फक्त दोन सामने खेळणार होता. पण तो आता ६ जानेवारी रोजी रेल्वेविरुद्धच्या सामन्यात खेळताना दिसू शकतो. वृत्तानुसार, विराटने सध्या बेंगळुरू सोडलं आहे, परंतु त्याच्या परतीच्या आशा कायम आहेत. विराट कोहलीचे कपडे आणि सामान अजूनही दिल्ली संघाकडे असल्याचे वृत्त आहे.६ जानेवारी रोजी विराट कोहली दिल्ली संघाकडून खेळेल की नाही हे भारतीय संघाच्या प्रशिक्षण शिबिरावर अवलंबून असेल. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका ११ जानेवारीपासून सुरू होत आहे.

## रोहिने पकडलेल्या कॅचची चर्चा

**जयपूर :** रोहित शर्माच्या शतकाची गेल्या सामन्या जोरदार चर्चा झाली, पण आता दुसऱ्या सामन्यात रोहितने पकडलेल्या कॅचची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. रोहित शर्माने दुसऱ्या सामन्यात शार्दुल ठाकूरच्या गोलंदाजीवर कशी कॅच पकडली, याचा व्हिडिओ जोरदार व्हायरल झाला आहे.ही गोष्ट घडली ती तिसऱ्या षटकात. मुंबईच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना ३३१ धावांचा डोंगर उभारला होता. या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी उत्तराखंडचे सलामीवीर मैदानात उतरले होते. मुंबईसाठी हे तिसरे षटक कर्णधार शार्दुल ठाकूर टाकत होता. त्यावेळी मुंबईचा संघ पहिल्या विकेट मिळवण्याच्या प्रतिक्षेत होता. यावेळी शार्दुल ठाकूरच्या गोलंदाजीचा सामना उत्तराखंडचा सलामीवीर कमल सिंग करत होता. या षटकाच्या चौथ्या चेंडवर ही गोष्ट घडल्याचे मिळाले.तिसऱ्या षटकाच्या चौथ्या चेंडूचा सामना करण्यासाठी उत्तराखंडचा डावखुरा सलामीवीर कमल सिंग सज्ज झाला होता. शार्दुल ठाकूरने गोलंदाजीला सुरुवात केली आणि त्याने हा चेंडू ऑफ स्टम्पच्या दिशेने टाकला. या चेंडूचा वेग एवढा होता की, कमल सिंगलासमजले नाही की, हा चेंडू मारायचा की सावधपणे खेळायचा. कमल सिंगला



द्विधा मनस्थितीत होती. त्यावेळी कमल सिंगच्या बॅटची कडा चेंडूला लागली आणि हा चेंडू स्लीपच्या दिशेने जायला लागला. जसा हा चेंडू स्लीपच्या दिशेने जायला लागला, तशी एका चाहत्याने रोहित शर्माच्या नावाची आरोळी ठोकली. चेंडू आपल्याकडे येत असल्याचे पाहत रोहित शर्मा सावध झाला. रोहित शर्माने यावेळी चेंडूच्या दिशेने आपले हात नेले. चेंडूचा वेग जास्त होता. त्यामुळे रोहित यावेळी चेंडूवर नजर ठेवून होता आणि आपेल हात चेंडूच्या जवळ आणत होता. रोहित शर्माने योग्य समन्वय साधला आणि ही कॅच पकडली. रोहित शर्माने कॅच पकडताच चाहत्यांनी मैदानात एकच जल्लोष केला. रोहित शर्मानेही ही कॅच पकडल्यावर जोरदार सेलिब्रेशन केले. कारण मुंबईच्या संघाला मिळालेली ही पहिली विकेट होती.

## हरमनप्रीत कौरने वर्ल्ड रेकॉर्डसह रचला क्रिकेटमध्ये इतिहास

**नवी दिल्ली :** भारताची कर्णधार हरमनप्रीत कौरच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. भारताने श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या टी २० सामन्यात मोठा विजय साकारला. या सामन्यात हरमनप्रीतने नाबाद २१ धावा केल्या. हा सामना संपला आणि त्यानंतर हरमनप्रीत कौरच्या नावावर एक मोठा वर्ल्ड रेकॉर्ड जमा झाला आहे.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारताने काही दिवसांपूर्वी वनडे वर्ल्ड कप जिंकला होता. त्यानंतर आता भारताने श्रीलंकेच्या संघाला धुळ चारली आणि तिसऱ्या सामन्यात विजय मिळवला. या विजयासह भारताने टी २० मालिकाही जिंकली आहे. त्यामुळे भारताचा आनंद द्विगुणीत झाला असेल. पण त्याचबरोबर हरमनप्रीत कौरने साकारलेला वर्ल्ड रेकॉर्ड म्हणजे भारतीय चाहत्यांसाठी दुग्ध शर्करा योग असल्याचे आता समोर आले आहे. कारण आतापर्यंत जगभरात कोणालाही जी गोष्ट जमली नाही ती फक्त हरमनप्रीत कौरने करून दाखवली आहे.भारतीय महिहा संघ यापूर्वी महत्वाच्या सामन्यांमध्ये पराभूत होत असल्याचे सर्वांनी पाहिले होते. पण हरमनप्रीत कौरने भारतीय महिला संघाची परीभाष बदलली. हरमनप्रीत कौरने भारतीय संघाला जेतेपदं जिंकायची सवय लावली, याचा परीपाक वर्ल्ड कपमध्ये साऱ्यांनी पाहिला. वर्ल्ड कप भारताने जिंकला आणि त्यानंतरही भारताची विजयी घोडदौड अजूनही सुरु असल्याचे पाहायला मिळाले. भारताने १-२ नाही तर सलग तीन सामन्यांत विजय मिळवला आहे. भारताने तिसरा टी २० सामना जिंकला आणि हरमनप्रीत कौरचा वर्ल्ड रेकॉर्ड सर्वांसमोर आला. जगातील टी २० क्रिकेटमध्ये आता सर्वाधिक सामने जिंकणारी कर्णधार आता हरमनप्रीत



कौर बनली आहे. ऑस्ट्रेलियाची टी २० कर्णधार मेग लॅनिंगच्या नावावर यापूर्वी ७६ विजय होते, पण आता हरमनप्रीत कौरच्या नावावर ७७ टी २० विजय झाले आहेत. त्यामुळे जागतिक क्रिकेटमध्ये आता सर्वाधिक सामने जिंकणारी कर्णधार म्हणून हरमनप्रीत कौरचे नाव घेतले जाणार आहे. कारण मेग लॅनिंगचा विजयाचा मोडीत काढत आता हरमनप्रीत कौरने वर्ल्ड रेकॉर्ड आता आपल्या नावावर केला आहे.भारताने तिसऱ्या सामन्यातही श्रीलंकेला पराभूत केले आणि त्यानंतर हरमनप्रीत कौरचा वर्ल्ड रेकॉर्ड आता समोर आला आहे.

# ६० व्या वाढदिवसाची तयारी सुरू असताना सलमान सापडला कायदेशीर अडचणीत..



नवी दिल्ली : बॉलिवूड सुपरस्टार सलमान खान २७ डिसेंबर २०२५ रोजी साठावा वाढदिवस साजरा करणार आहे. त्यापूर्वी तो एका कायदेशीर अडचणीत सापडला आहे. 'राजश्री पान मसाला' या उत्पादनासंदर्भातील हे प्रकरण आहे. या पान म सालाच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीशी संबंधित एका प्रकरणात, शुक्रवारी राजस्थानमधील कोटा याठिकाणच्या ग्राहक न्यायालयाने कठोर भूमिका घेतली असून न्यायालयाने अभिनेत्याला प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. २० जानेवारी रोजी याप्रकरणी पुढील सुनावणी होणार आहे. केवळ दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीपुरते हे प्रकरण मर्यादित राहिले नसून बनावट स्वाक्षरीशी संबंधित आहेत. बनावट स्वाक्षरीचे आरोप झाल्याने, या प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले आहे. झढख ने याविषयी वृत्त दिले आहे.याआधी ९ डिसेंबर रोजी झालेल्या सुनावणीत, तक्रारदार आणि राजस्थान उच्च न्यायालयाचे वकील इंद्र मोहन सिंग यांनी असा दावा केला आहे की, या प्रकरणाशी संबंधित न्यायालयात सादर केलेल्या पॉवर ऑफ ॲटर्नी आणि सलम ानकडून देण्यात आलेल्या उत्तरावर जी स्वाक्षरी आहे, ती सलमान खानची नसून बनावट आहे. इंद्र मोहन सिंग हे एक भाजपा नेतेही आहे.

त्यांनी असा युक्तिवाद केला की त्यांनी जोधपूर तुरुंग आणि इतर न्यायालयांमधून सलमानची मूळ स्वाक्षरी असलेली कागदपत्रे मिळवली आहेत आणि या कागदपत्रांवरी स्वाक्षरी कोटा न्यायालयात सादर केलेल्या स्वाक्षरीपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. न्यायालयाने हा आरोप गांभीर्याने घेतला असून शुक्रवारी झालेल्या सुनावणीत सलमानच्या स्वाक्षरीची ऋडङ (फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी) तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले.हे स्वाक्षरी प्रकरण राजश्री पान मसालाच्या जाहिरातीशी संबंधित आहे. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी या जाहिरातीसंदर्भात करण्यात आलेल्या तक्रारीत असा आरोप करण्यात आला होता की, ही कंपनी आणि सलमान खान 'वेलची आणि केशर' या अन्नपदार्थांचा प्रचार करून तरुणांना दिशाभूल करत आहेत. वकील इंद्र मोहन सिंह यांनी असा सवाल उपस्थित केला होता की, जर बाजारभावानुसार, केशरची किंमत ४ लाख रुपये प्रति किलो आहे, तर ५ रुपयांना पाऊचमध्ये केशर कसे उपलब्ध होऊ शकते?

त्यांनी असा आरोप केला की अशा जाहिराती तरुणांना कर्करोगासारख्या घातक आजारांकडे ढकलत आहेत आणि सलमान खान केवळ पैशासाठी अशा उत्पादनाचा ब्रँड ॲम्बेसेडर बनला आहे. आता एफएसएल अहवालात अभिनेत्याच्या स्वाक्षरीमध्ये अनियमितता आढळली तर सलमान खानसाठी नवीन संकट निर्माण होऊ शकते. सलमान खान कोर्टात हजर राहिल्यानंतर २० जानेवारी रोजी मिळणाऱ्या अपडेटची प्रतीक्षा आहे



## २५ दिवसातही सत्ताबदल होतो', स्वानंदीचा मल्लिकाला इशारा; तेजश्री प्रधानच्या चाहत्यांना 'डबल' सरप्राइज



मुंबई : अभिनेत्री तेजश्री प्रधान आणि अभिनेता सुबोध भावे यांची वीणा दोघांतली ही तुटेना ही मालिका सध्या विशेष लोकप्रिय झाली आहे. झी मराठीच्या या मालिकेने अल्पावधीतच टीआरपी यादीतही स्थान मिळवले. मालिकेतील स्वानंदी आणि समर या जोडीला प्रेक्षकपसंती मि ळते आहे. आता आगामी भागात एक धमाकेदार ट्विस्ट पाहायला मिळणार आहे. याशिवाय चाहत्यांना नवीन वर्षात खास सरप्राइजही मिळेल.वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेच्या चाहत्यांना ५ जानेवारी रोजी हे खास सरप्राइज मिळणार आहे. या दिवशीचा एपिसोड २ तासांचा प्रसारित होणार आहे. 'स्वानंदी आणि मल्लिका समोरासमोर येणार.. २५ दिवसात राजवाडेंकडे 'सत्ता बदल' होणार? पाहा, 'वीण दोघांतली ही तुटेना'... २ तासांचा डबल धमाका!' असे कॅप्शन देत झी मराठीच्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवर हा लेटेस्ट प्रोमो शेअर करण्यात आला.येत्या २५ दिवसात मल्लिकाचं सत्य सर्वांसमोर येण्याची शक्यता आहे. लेटेस्ट प्रोम ोमध्येअसे दाखवले आहे की, मल्लिका स्वानंदीला इशारा देते. मल्लिका म्हणते, 'गेली २५ वर्ष माझीच सत्ता आहे.' तेव्हा स्वानंदी तिला आव्हान देते की, 'वेळीच सावरा काकू, कारण सत्ताबदल व्हायला २५ दिवसही पुरतात.' मल्लिका आणि अंशुमन यांचा खरा चेहरा सर्व राजवाडेंसमोर आणण्यासाठी स्वानंदी नेमकं काय करेल, हे पाहणं महत्वाचं ठरेल. दरम्यान प्रेक्षकांनी या प्रोमोवर कमेंट करत आनंद व्यक्त केला. निदान स्वानंदीसमोर तरी काकूचा खरा चेहरा आला, अशा आशयाच्याकमेंट करत चाहत्यांनी सकारात्मक कमेंट केल्या आहेत.

अलिकडेच मल्लिकाने स्वानंदी-समरचा अपघात घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता, मात्र तिचा तो प्रयत्न फसला. त्या दोघांनीही घरात अपघाताविषयी सांगितले नाही, तरीही मल्लिकाने त्यांची विचारपूस केली. यावरुन स्वानंदीला मल्लिकाचा संशय आला आहे.

## कोणालाही माझा अपमान करू देणार नाही : प्राजक्ता माळी

मुंबई : अनेक कलाकार सोशल मीडियावर सक्रीय असतात आणि चाहत्यांच्या संपर्कात राहतात. अशीच एक अभिनेत्री म्हणजे प्राजक्ता माळी. प्राजक्ता माळीनं आपल्या सौंदर्यानं, हास्यानं संपूर्ण म हाराष्ट्राला वेड लावलं आहे. प्राजक्ताचा मोठा चाहतावर्ग आहे. प्राजक्ता सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांना तिच्याविषयी अपडेट्स देते. 'आस्क मी' सेशनच्या म ाध्यमातूनही ती चाहत्यांसोबत संवाद साधते. आता २०२६ हे नवीन वर्ष सुरू होत असताना प्राजक्ताने तिचा एक महत्वाचा संकल्प चाहत्यांसोबत शेअर केला आहे. प्राजक्ताचा हा संकल्प ऐकून सर्वांनी अभिनेत्रीचं कौतुक केलं आहे.प्राजक्ता माळीने इन्स्टाग्रामवर 'आस्क मी' सेशन घेतलं. या सेशनदरम्यान अभिनेत्रीनं चाहत्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरं दिली. या सेशनदरम्यान अभिनेत्रीला एका चाहत्याने, तिच्या नवीन वर्षाच्या संकल्पाबद्दल विचारलं. त्यावर प्राजक्ता माळी म्हणाली की, 'यंदा माझा नवीन वर्षाचा संकल्प हा आहे की, मी कोणालाही माझा अपमान करू देणार नाही. इतरांपेक्षा स्वतःशी चांगलं वागणं आणि स्वतःचा आदर ठेवणं हे माझ्यासाठी अधिक महत्त्वाचं आहे.' प्राजक्ताचा हा संकल्प ऐकून चाहते अभिनेत्रीचं कौतुक करत आहेत.२०२५ हे वर्ष प्राजक्तासाठी काही काळासाठी कठीण गेलं. भाजपा आमदार सुरेश धस यांनी प्राजक्ता माळीबद्दल केलेलं वादग्रस्त वक्तव्य चर्चेत आलं होतं. त्यामुळे वातावरण चांगलंच तापलेलं. मात्र, यानंतर प्राजक्ताने पत्रकार परिषद घेऊन सडेतोड उत्तर दिलेलं आणि माफी मागावी असंही म्हटलं होतं.दरम्यान, प्राजक्ता माळीच्या कामाबद्दल सांगायचं तर तिनं 'जुळून येती रेशीमगाठी', 'नकटीच्या लग्नाला यायचं हा' यांसारख्या मालिकांम ध्ये काम केलं आहे. त्याचबरोबर तिनं 'फ ुलवंती' या सिनेमातून निर्मिती क्षेत्रातही पदार्पण केलं. या सिनेमासाठी प्राजक्ताला अनेक पुरस्कारसुद्धा मिळाले. तसंच प्राजक्ताने 'चिकी चिकी बुबुम बूम', 'हंपी', 'चंद्रमुखी', 'पावनखिंड', 'खो-खो' यांसारख्या सिनेमांमध्ये काम केलंय. इतकंच नव्हे तर, प्राजक्तानं 'रानबाजार' या वेब सीरिजमध्येही काम केलंय.

# अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार जाहीर...

## संग्रामपूर तालुका पत्रकार संघ अमरावती विभागातून अव्वल आदर्श संघ म्हणून निवड!

**जनसंचलन/बुलढाणा**

मराठी पत्रकारितेतील उत्कृष्टता, संघटित कार्याचा वेध, सामाजिक बांधिलकी आणि पत्रकारहितासाठी सातत्याने लढा देणाऱ्या आदिवासी बहुल तालुक्यातील संग्रामपूर तालुका पत्रकार संघाने राज्यात ऐतिहासिक ठसा उमटवला आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने जाहीर करण्यात आलेल्या वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कारांमध्ये, अमरावती विभागातून एकमेव निवड बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुका पत्रकार संघाची झाली आहे. ही निवड संघटनेच्या तडफदार कार्यशैलीची, चिकाटीची, तसेच प्रामाणिक सामाजिक योगदानाची ठळक दखल असल्याचे परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या घोषणेने संग्रामपूर तालुक्याचा मान राज्यभरात उंचावला आहे. अमरावती महसूल विभागातून बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुका पत्रकार संघाची निवड झाल्याची घोषणा मराठी पत्रकार परिषद मुंबई मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख व अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर यांनी केली.सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल, श्रीफळ असा मानाचा बहुमान देऊन हा पुरस्कार कर्जत (जि. रायगड) येथे फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात होणाऱ्या राज्यस्तरीय भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे राज्यातील हजारो पत्रकारांच्या साक्षीने हा कार्यक्रम दणदणीत पार पडणार आहे. पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य व वसंतराव काणे यांच्या नावे देण्यात येणारा हा पुरस्कार राज्यातील प्रतिष्ठेच्या पत्रकार संघ पुरस्कारांपैकी एक असून, संग्रामपूर संघाला हा बहुमान मिळणे हे अत्यंत अभिमानाचे मानले जात आहे. मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख सरांसह राज्य पातळीवरील विविध पदाधिकाऱ्यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीतभाई राजपूत व सर्व पदाधिकारी-मंडळींचा सक्रिय सहभाग व मार्गदर्शन आणि संघातील तरुण कार्यकर्त्यांचे नवचैतन्यया सर्वांचा परिपाक म्हणजे हा राज्यस्तरीय गौरव असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. संग्रामपूर तालुका पत्रकार संघ सामाजिक प्रश्नांवर ठाम भूमिका, लोकसहभागातून जनजागृती, तसेच नागरिकांच्या अडचणी शासनदरबारी पोहोचवण्याचे कार्य उल्लेखनीयपणे करत आहे. पत्रकारिता म्हणजे केवळ बातमी लेखन नव्हे तर सामाजिक बांधिलकी जपणे, याचे उत्तम उदाहरण म्हणून या आदिवासी बहुल संग्रामपूर तालुक्यातील पत्रकार संघाकडे राज्यभरात पाहिले जाते. निवडीमागचे खरे कारण म्हणजे विविध सामाजिक उपक्रम, तळागाळातील पत्रकारांचे सक्षमीकरण, प्रशिक्षण, जनहितासाठी चालवलेली सततची मोहीम, तसेच लोकसहभागातून घेतलेले उपक्रम यामुळे परिषदेने संग्रामपूरची दखल घेतली. त्यानंतर परिषदेच्यावतीने अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.या गौरवाबद्दल मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, डिजिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, महिला आघाडी प्रमुख शोभा



जयपूरकर, राज्य प्रसिद्धी प्रमुख संदीप कुलकर्णी तसेच बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीतभाई राजपूत यांनी संघाला हार्दिक शुभेच्छा दिल्या. आदिवासी बहुल तालुक्यातील पत्रकार संघाला संग्रामपूर बुलढाण्याचा मान उंचावणारा अभिमान मिळाल्याबद्दल तसेच राज्य पातळीवरील या भव्य गौरवाबद्दल अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे संग्रामपूर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर दांदळे, जिल्हा समन्वयक पंजाबराव ठाकरे, सत्यशोधक समिती जिल्हा कार्याध्यक्ष अझहर आली, ज्येष्ठ मार्गदर्शक रामेश्वर गायकी, केंद्रीय जिल्हा कार्यकारिणी सदस्य श्याम देशमुख, तालुका कार्याध्यक्ष राजेंद्र धर्माधिकारी, सचिव विवेक राऊत, उपाध्यक्ष कासम सुरत्ने, सहसचिव शेख रफिक पन्ना, कोषाध्यक्ष वासुदेव दामोधर, तालुका संघटक श्याम इंगळे, संघटक मोहन सोनोने, विभागीय संघटक डॉ. संतोष लांडे, आकाश पालीवाल,हल्लाकृती समिती स्वप्निल देशमुख, डिजिटल मीडिया तालुका अध्यक्ष गोपाल धर्मळ, उपाध्यक्ष भगवान पाखरे, सचिव निलेश तायडे यांनी सर्व सन्माननीय वरिष्ठ पदाधिकारी व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची थेट कर्ज योजना...

**जनसंचलन/बुलढाणा**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत थेट कर्ज योजना राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत मातंग समाजातील पात्र अर्जदारांना एक लाख रुपयांपर्यंत थेट कर्ज देण्यात येणार आहे. या योजनेसाठी दि. २९ डिसेंबर २०२५ ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. या योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्हा कार्यालयास सन २०२५२६ या आर्थिक वर्षासाठी ५० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रकल्प मर्यादा रुपये एक लाख रुपये असून त्यापैकी १० हजार रुपये अनुदान, ५ टक्के अर्थात ५ हजार रुपये लाभार्थी सहभाग व उर्वरित ८५ हजार रुपये महामंडळाचे कर्ज उपलब्ध करण्यात येणार आहे. योजनेचे आर्थिक उद्दिष्ट ५० लाख रुपये आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मातंग समाजातील १२ पोटजातींतील इच्छुक अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे, वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे, तसेच यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराचा सिबिल क्रेडिट स्कोअर किमान ५०० असणे आवश्यक आहे. अर्ज स्वतः अर्जदाराने, आवश्यक कागदपत्रांसह दोन प्रतींमध्ये जिल्हा कार्यालयात सादर करायचे असून त्रयस्थ/मध्यस्थामार्फत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, दोन फोटो, रेशन कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, घरटॅक्स पावती, कोटेशन, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, ग्रामपंचायत/नगरपालिका नाहरकत प्रमाणपत्र किंवा शॉप ॲक्ट परवाना, व्यवसायासंबंधी तांत्रिक प्रमाणपत्र, शैक्षणिक दाखला, अनुदान/कर्ज न घेतल्याचे स्वयंघोषणापत्र, आधार-संलग्न बँक खात्याचा तपशील आदी. प्राप्त अर्जांची निवड लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेनंतर मा. उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चिठ्ठीद्वारे (लॉटरी पद्धतीने) करण्यात येईल. निवडीनंतर वैधानिक दस्तऐवजांची (एक जामीनदारासह) पूर्तता झाल्यावर कर्ज वितरण केले जाईल. महामंडळाच्या विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयीन वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक डि. एस. पाखमोडे यांनी केले आहे.




# बँकांमधील दावा न केलेल्या ठेवी परत मिळविण्यासाठी विशेष शिबिर...

**जनसंचलन/ बुलढाणा**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनानुसार बँकांमध्ये दीर्घकाळ दावा न झालेल्या ठेवी संबंधित खातेदारांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत मिळाव्यात, यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हा अग्रणी बँक कार्यालयामार्फत सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता जिल्हा नियोजन भवन, बुलढाणा येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये १० वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून बँक, पेंशन, विमा, शेअर, म्युच्युअल फंड आदी ठिकाणी जमा असून व्यवहार न झालेल्या रकमेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत अशा बेवारस ठेवी संबंधित खातेदारांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत देण्यात येणार आहेत. नागरिकांनी उद्यम पोर्टल किंवा संबंधित बँक किंवा संस्थेच्या संकेतस्थळावर आपले नाव तपासून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बँक शाखेत अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच बुलढाणा जिल्ह्यात एकूण सुमारे १ लाख ३६ हजार १७ खातेदारांच्या दावा न केलेल्या ठेवी असून त्यांची एकूण रक्कम अंदाजे ४८ कोटी ७२ लाख रुपये इतकी आहे. त्यामुळे उर्वरित पात्र खातेदारांनी किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांनी विलंब न करता आपल्या जवळच्या संबंधित बँक शाखेशी संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून आपली रक्कम परत घ्यावी, असे आवाहन देखील




सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अग्रणी जिल्हा प्रबंधक यांनी केले आहे.

# पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मासरूळ हॉटस्पॉट

**जनसंचलन/बुलडाणा**

बुलडाणा तालुका अंतर्गत येणाऱ्या मासरूळ परिसरात पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने मासरूळ परिसर सध्या संपूर्ण तालुक्याच्या राजकीय नकाशावर केंद्रस्थानी आला आहे. प्रमुख राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारही जोरदार तयारीला लागले असून गावोगावी बैठका, मतदारांशी थेट संवाद, संपर्क मोहिमा तसेच कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींना वेग आला आहे. तिकीट कोणाला मिळणार, कोणता गट बाजी मारणार, यावरून राजकीय चर्चांना उधाण आले असून परिसरात निवडणुकीपूर्व वातावरण तयार झाले आहे. मासरूळ परिसर हा मतदानाच्या दृष्टीने महत्त्वाचा व निर्णायक मानला जात असल्याने सर्वच पक्षांनी येथे विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. मासरूळ जिल्हा परिषद सर्कलमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे गेल्या तीन पंचवार्षिकपासून निर्विवाद वर्चस्व राहिलेले आहे परंतु यावेळी येथे भाजपा तसेच राष्ट्रवादी यांच्याकडून ही मोठी ताकद यावेळी पाहायला मिळणार आहे. तसेच याठिकाणी पाणीटंचाई, वीजपुरवठा, खराब रस्ते, शिक्षण, आरोग्य सेवा, रोजगार आणि शेतीविषयक प्रश्न हे प्रमुख मुद्दे ठरत असून इच्छुक उमेदवारांकडून विकासाच्या आश्वासनांची रेलचेल सुरू आहे.मासरूळ सर्कल मध्ये शिवसेनेचे जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत तसेच भाजपा कडून सुनील देशमुख, राष्ट्रवादी मनोज दांडगे व शिवसेना शिंदे गट यांच्याकडून गजानन लांडे यांच्यामध्ये येथे सामना होताना दिसून येईल परंतु जनता कोणाला पसंती देईल हेही बघण्यासारखे असेल. दरम्यान, इच्छुकांची संख्या वाढल्याने पक्षांतर्गत स्पर्धा तीव्र झाली असून काही ठिकाणी नाराजीचे सूरही उमटताना दिसत आहेत. काही इच्छुकांकडून वरिष्ठ पातळीवर लॉबिंग सुरू असल्याची चर्चा असून उमेदवारीच्या अंतिम यादीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकूणच पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मासरूळ परिसर आता खऱ्या अर्थाने ङ्खहॉटस्पॉटफ ठरत असून, येथील राजकीय समीकरणे आणि घडामोडी संपूर्ण बुलढाणा तालुक्याच्या निकालावर निर्णायक प्रभाव टाकणाऱ्या ठरणार आहेत.तसेच यावेळी शिवसेनेचा गड मानल्या जाणाऱ्या मासरूळ सर्कल वर नेमक कोण बाजी मारणार पाहण्या सारखं आहे

## राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचा आठवा वर्धापन दिन

# ऐतिहासिक बुलढाणा जिल्ह्यात भव्य स्वरूपात संपन्न होणार

**जनसंचलन/बुलढाणा**

पत्रकारांच्या हक्कांसाठी, न्यायासाठी आणि स्वाभिमानासाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचा आठवा वर्धापन दिन मंगळवार, ३० डिसेंबर २०२५ रोजी ऐतिहासिक बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. हा वर्धापन दिन सोहळा राज्याध्यक्ष मा. विष्णू कंकाळ यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला असून, राज्य व केंद्र पातळीवरील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या वर्धापन दिन कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार मा. संजय गायकवाड यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय आयुष मंत्री मा. प्रतापराव जाधव आणि महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा. आकाश फुंडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष मा. विजय सूर्यवंशी असणार आहेत. आठ वर्षांच्या संघर्षमय वाटचालीचा लेखाजोखा मांडत ते पत्रकार संघटनेची भूमिका, ध्येयधोरणे व भावी दिशा स्पष्ट करणार आहेत. या वर्धापन दिन सोहळ्यात पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर मार्गदर्शन, संघटनेच्या वर्षभरातील कार्याचा आढावा, तसेच पत्रकार सन्मान व पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होणार आहे. पत्रकार संरक्षण कायदा, पत्रकार पेन्शन योजना, ग्रामीण पत्रकारांचे प्रश्न आणि अन्यायग्रस्त पत्रकारांच्या पाठीशी उभे राहण्याच्या संघटनेच्या भूमिकेवर यावेळी विशेष भर देण्यात येणार आहे. हा भव्य व ऐतिहासिक कार्यक्रम गर्दे सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, बुलढाणा येथे दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आला असून, राज्यभरातील पत्रकार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या वतीने आयोजकांनी केले आहे.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**जनसंचलन/ खामगाव**

ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी २१ वर्षीय युवकाविरुद्ध २८ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, शाळेत जात असताना आरोपीने मुलीचा पाठलाग करून तो तिच्यावर प्रेम करीत असल्याचे सांगितले तसेच नकार दिल्यास वडील व भावाला बघून घेण्याची धमकी दिल्याचे नमूद आहे. ही बाब नातेवाइकांना कळविल्यानंतर खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ७५ (१), ७८, ३५१ (२) (३) सहकलम १२ पॉक्सोनुसार गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा तपास सहायक पोलिस निरीक्षक रवी मुंडे करीत आहे

# भानापूर येथील शेतकऱ्याची आत्महत्या

**जनसंचलन/ सुलतानपूर**




येथून जवळच असलेल्या भानापूर येथील शेतकरी अर्जुन कचरूबा आव्हाळे ( वय ३५) यांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. अर्जुन आव्हाळे यांच्याकडे ५८ गुंठे शेती होती. अतिवृष्टीमुळे त्यांच्या शेतातील संपूर्ण पीक नष्ट झाले. त्यामुळे बँक कर्जासह खासगी उसनवारीची परतफेड करणे अशक्य झाल्याने ते गेल्या काही दिवसांपासून मानसिक तणावाखाली असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली आहे. दरम्यान, २७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास गावालगत असलेल्या स्वत:च्या शेतातील गोठ्यात त्यांनी विषारी औषध सेवन केले. ही बाब लक्षात येताच, नातेवाइकांनी त्यांना तातडीने मेहकर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले; मात्र, उपचाराच्या दरम्यान त्याच दिवशी सायंकाळी ८ वाजताच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यापश्चात पत्नी, आई, एक लहान मुलगा व भाऊ असा परिवार आहे. कुटुंबाचा कर्ता पुरुष अचानक गमावला गेल्याने कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या चिमुकल्या मुलाच्या डोक्यावरून पितृछत्र हरपल्याने गावात शोककळा पसरली आहे.

# वीर बाल दिवस उत्साहात साजरा

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

येथील समर्थ कृषी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे सिनगाव जहागीर येथील जनता माध्यमिक शाळेत वीर बाल दिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास जनता माध्यमिक शाळेचे प्राचार्य प्रा. लांबे व प्रा. मेहेत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शौर्य व त्यागाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने निबंध स्पर्धा, प्रश्नमंजूषा, वीर बाल जनजागृती फेरी तसेच कथाकथन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. हे सर्व उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे व उपप्राचार्य प्रा. देवानंद नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. गुरुगोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादा जोरावर सिंगजी व साहिबजादा फतेह सिंगजी यांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ वीर बाल दिन साजरा केला जातो. याप्रसंगी रासेयो अधिकारी प्रा. योगेश चगदळे यांनी कथांच्या माध्यमातून शौर्य, त्याग व बलिदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८